ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 34 ]
Total No. of Questions : 34 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
[ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 04-M (OS)**

**Code No. : 04-M (OS)**

**ಶಿಕ್ಷಣ – II**

**EDUCATION – II**

# ಆಧುನಿಕ ಶಿಕ್ಷಣದಲ್ಲಿ ಮನೋವಿಜ್ಞಾನ

# PSYCHOLOGY IN MODERN EDUCATION

(ಮರಾಠಿ ಭಾಷಾಂತರ)

( Marathi Version )

**(ಹಳೆ ಪಠ್ಯವಸ್ತು)**

**( Old Syllabus )**

ದಿನಾಂಕ : 06. 06. 2017 ]
Date : 06. 06. 2017 ]

ಸಮಯ : ಬೆಳಿಗ್ಗೆ 10.00 ರಿಂದ ಮಧ್ಯಾಹ್ನ 1.00 ರವರೆಗೆ ]
Time : 10.00 A.M. to 1.00 P.M. ]

[ ಪರಮಾವಧಿ ಅಂಕಗಳು : 100
[ Max. Marks : 100

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

**भाग - अ**

I. खालीलपैकी कोणत्याही **चार** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **तीन** पानांपेक्षा जास्त असू नये. त्याच प्रश्नाच्या भाग (a) आणि भाग (b) ची उत्तरे लिहीणे आवश्यक आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दहा** गुण आहेत. 4 × 10 = 40

1. a) शैक्षणिक मानसशास्त्र म्हणजे काय ? शैक्षणिक मानसशास्त्राची उद्दिष्ट्ये लिहा.

   b) शैक्षणिक मानसशास्त्राच्या आकलनाने ( जाणून घेण्याने ) शिक्षकाला होणारे फायदे लिहा. 6 + 4

2. a) ब्रुनरच्या ज्ञानात्मक विकासाचे योग्य उदाहरणासह वर्णन करा.

   b) शिक्षक या नात्याने तुम्ही तुमच्या वर्गात विकासाचे तत्व कसे लागू कराल ? ( अंमलात आणाल ). 6 + 4

3. a) अंतर्ज्ञानाच्या अध्ययनासाठी आवश्यक असणारे घटक लिहा. या अध्ययनासाठी कोहलरच्या प्रयोगाचे वर्णन करा.

b) चूका आणि शिका अध्ययनाची शैक्षणिक सूचितार्थे ( Implications ) लिहा.

6 + 4

4. a) स्मरणशक्ती वाढविण्याचे परिणामकारी मार्ग काय आहेत ?

b) दोन प्रकाराच्या स्मरणशक्तीची नांवे लिहा आणि वर्णन करा. 6 + 4

5. a) वैयक्तिक फरकाच्या कोणत्याही चार कारणांचे वर्णन करा.

b) दृष्टीदोष असलेली मुले ओळखण्यासाठी तुम्ही कोणती लक्षणे विचारात घ्याल ?

6 + 4

6. a) विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याचे संरक्षण ( जतन ) करण्यासाठी शिक्षकाची भूमिका कोणती ?

b) प्रक्षेपण तंत्र हे इतर व्यक्तीमत्व चाचणीपेक्षा वेगळे कसे आहे ? 6 + 4

7. a) 'उत्तम नेता' म्हणून विचारात घेण्यासाठी 'लोकशाही नेत्याची' कोणतीही सहा कारणे संक्षिप्तपणे विशद करा.

b) तुमच्या वर्गातील तारे ( प्रतिभावंत विद्यार्थी ) ओळखण्यासाठी तुम्ही समाजमिती तंत्राचे कसे आयोजन कराल ? 6 + 4

## भाग - ब

II. खालीलपैकी कोणत्याही **सात** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **एका** पानापक्षा जास्त असू नये. प्रत्येक प्रश्नाला **पाच** गुण आहेत. $7 \times 5 = 35$

8. वर्गखालीच्या व्यवस्थापनामध्ये शैक्षणिक मानसशास्त्राच्या आकलनामुळ होणाऱ्या कोणत्याही पाच उपयोगांची यादी करा.

9. बालक मानसशास्त्राचा सामाजिक मानसशास्त्राशी असलेल्या संबंधाचे वर्णन करा.

10. प्रभुत्व अध्ययनाचे तंत्र हे औपचारिक अध्यापनापासून वेगळे कसे आहे ?

11. अध्ययनामध्ये आवड निर्माण करण्यासाठी तुम्ही कोणत्या कृती ( कराल ) द्याल ?

12. असमायोजनांची ( Maladjustment ) कारणे लिहा.

13. अध्ययनाच्या हस्तांतरणासाठी ( transfer ) शिक्षकांने वापरलेल्या क्रमाबद्दल लिहा.

14. सर्जनशीलता म्हणजे काय ? विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता कशी विकसित कराल ?

15. अध्ययन आणि परिपक्वता यामधील संबंधाचे योग्य उदाहरणासहीत वणन करा.

16. मंद अध्ययन कर्त्यापेक्षा तुलनात्मकरित्या प्रतिभावंत विद्यार्थी अध्ययनात वेगळे कसे असतात ?

17. अलपोर्टच्या मते व्यक्तीमत्वाची व्याख्या लिहा आणि व्यक्तीमत्वाच्या लक्षणांची यादी करा.

**भाग - क**

III. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **अर्ध्या** पानापेक्षा जास्त असू नये. प्रत्येक प्रश्नाला **तीन** गुण आहेत. 5 × 3 = 15

18. अंतरावलोकनाची ( Introspection ) लक्षणे लिहा.

19. थॉर्नडाईकनी सचविलेले अध्ययनाचे नियम लिहा.

20. थकव्याच्या कारणांची यादी करा.

21. गट बुद्धीमत्ता चाचणी म्हणजे काय ? दोन उदाहरणे लिहा.

22. व्यक्तीमत्वावर प्रभाव करणारे तीन जीवशास्त्रीय आणि परिसर घटक लिहा.

23. निराशेची कारणे कोणती आहेत ?

24. विद्यार्थ्याला ( बालकाला ) वाचनाचा सराव होण्यासाठी कसे मार्गदर्शन कराल ?

**भाग - ड**

IV. खालील सर्व प्रश्नांची उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नांचे उत्तर **एक** किंवा **दोन** वाक्यापेक्षा जास्त असू नये. प्रत्येक प्रश्नाला **एक** गुण आहे. $10 \times 1 = 10$

25. स्वतःची वर्तणूक बदलविण्यासाठी कोणत्या प्रकारची वैयक्तिक अभ्यासाची पद्धत जास्त ( अधिक ) उपयुक्त आहे ?

26. ब्रुनरच्यानुसार विकासाचे टप्पे लिहा.

27. थॉर्नडाईकच्यानुसार अध्ययनाची व्याख्या लिहा.

28. विस्मरणाचा दर शोधून काढणाऱ्या ( शोधणाऱ्या ) मनोवैज्ञानिकाचे नांव लिहा.

29. गेस्टाल्ट ( Gestalt ) मनोवैज्ञानिकाने सूचविलेल्या अध्ययन सिद्धांताचे नांव लिहा.

30. ‘‘जर एखाद्याला पाढे व्यवस्थित येत असतील तर गुणाकाराची उदाहरणे सहजपणे सोडविता येतात.’’ येथे कोणत्या प्रकारच्या अध्ययन हस्तांतर ( transfer ) दिसून येतो ?

31. ब्रेल लिपीचा कोठे वापर करतात ?

32. भावनिक बुद्धीमता चाचणीने कोणत्या घटकाचे स्पष्टीकरण होते ?

33. टर्मन ( Turman ) च्या मते प्रतिभावंत बालक कोणते ?

34. TAT चा विस्तार करा.